**नि.दि.दा.क्र.७७/२०११**

रामसिंग वि.डिगंबर

नि.क्र.१८३

प्रतिवादीतर्फे सा.क्र.०३

**शपथेवर खरे सांगतो,**

| | |
|---|---|
| माझे नाव | अजय माधव कुळकर्णी, |
| वय | ४३ वर्षे, धंदा – वकीली, |
| रा. | यावल, ता. यावल, जि. जळगांव. |

**प्रतिवादीतर्फे सरतपास विधीज्ञ श्री.एस.जी.कवडीवाले यांचेतर्फे...**

०१. प्रस्तुत दाव्यात माझी न्यायालयतीन आयुक्त म्हणून नेमणुक झाली होती. न्यायालयीन आयोगाचे काम करण्यापुर्वी उभयपक्षकार व त्यांच्या विधीज्ञांना लेखी सुचना दिल्या होत्या. त्यानंतर दिनांक २०.११.२०११रोजी प्रत्यक्ष वाद जागेवर जावून आयोगाचे काम केले होते. सदर दिवशी प्रत्यक्ष जागेवर उभयपक्षकार त्यांच्या विधीज्ञांसह हजर होते. मी गट नं.२६२ व २६३ या मिळकतीबाबत रस्त्यांची पाहणी केली. मला पाहणीमध्ये गट नं.२६२ व २६३/१, २६३/२, व २६३/३ या मिळकतींपर्यंत जाणारा कोणताही रस्ता आढळून आला नाही. मी नि.३८ वरील अहवाल सादर केला आहे. सदर अहवालासोबत नकाशा दाखल केला आहे. आता दाखविलेला नि.३८ वरील अहवालातील मजकुर खरा व बरोबर असून त्यावर माझी सही आहे. तसेच, सदर अहवालासोबत सादर केलेल्या नकाशातील मजकुर खरा व बरोबर असून त्यावर माझी सही आहे. सदर नकाशास **नि.१८४** देण्यात येते.

०२. नि.१८४ मध्ये नमुद केल्याप्रमाणे वादीचा गट नं.२८१ च्या पुर्वेस मनवेल शिव असुन शिवाने गट नं.२८१ च्या पुर्व बांधापर्यंत रस्ता आहे. नि.१८४ मध्ये गट

नं.२५७ च्या बाजूस लाल शाईने दाखविलेला रस्ता हा थोरगव्हाण शिवकडून सदर गटाच्या उत्तर बांधापर्यंत आलेला आहे. वरील रस्ता हा प्रतिवादींच्या शेतापर्यंत गेलेला नाही. मी न्यायालयीन आयोगाचे कामकाज करण्यासाठी गेलो त्यापुर्वी गट नं.२५० च्या उत्तर बांधापर्यंत रस्ता दिसून आला. सदर गट नं.२५० मध्ये केळी व कपाशीचे पिक लावलेले होते व झाडाखाली शेणखताचा मोठा ढिग पडलेला होता. तिथपर्यंत ट्रॅक्टरच्या चाकाच्या खुणा मला दिसून आल्या होत्या. ट्रॅक्टरच्या दोन्ही चाकांच्या खुणांच्यामध्ये कपाशीचे पिक होते. सदर रस्ता प्रतिवादींच्या शेतापर्यंत नव्हता.

**उलटतपास वादीतर्फे श्री.बि.जी.पाटील यांचेतर्फे.**

०३. हे म्हणणे खरे आहे की, नि.३८ वरील अहवालामध्ये गट नं.२६४ बाबत मी काहीही नमुद केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, गट नं.२६४ च्या दक्षिणेस असलेल्या गटाचा उल्लेख मी नि.१८४ च्या नकाशात केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, गट नं.२६४ व त्याच्या लगतच्या दक्षिणेकडील असलेल्या गटाच्या पश्चिमेस लागून प्रथम रस्ता आहे व त्यानंतर पाटाची चारी आहे.

०४. हे म्हणणे खरे आहे की, स्थळ पाहणी वेळी गट नं.२६१, २८० व २८१ मधून मला कोणताही रस्ता आढळून आलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, गट नं.२८१ च्या पश्चिमेकडे लागून असलेल्या गटांतुन मला कोणताही रस्ता आढळून आला नाही.

०५. हे म्हणणे खरे नाही की, न्यायालयीन आयुक्ताचे काम करतांना वादीचे विधीज्ञ वयस्क असल्याने कामकाजाचे वेळी ते एका झाडाखाली थांबून होते. हे म्हणणे खरे नाही की, न्यायालयीन आयोगाचे कामकाज करतांना वादींनी गट नं.२६४ व

त्यांच्या लगत असलेल्या गटातुन प्रतिवादींच्या शेतामध्ये जाण्यासाठी रस्ता असल्याचे दाखविण्याचा प्रयत्न केला होता. हे म्हणणे खरे नाही की, गट नं.२६४ व त्यालगतच्या दक्षिणेकडील गट हा विधीज्ञ डि.जी.पाटील व त्यांचे भाउ योगराज पाटील यांचे मालकीचा असल्याने मी सदर रस्त्यांचा उल्लेख नि.१८४ मध्ये घेण्याचे टाळले. हे म्हणणे खरे नाही की, नि.३८ वरील अहवाल व १८४ नकाशा हा दिसत्या परिस्थितीप्रमाणे तयार केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींच्या शेतामध्ये जाण्यासाठी रस्ता अस्तीत्वात असतांनाही मी तो हेतुपुर्वक नि.३८ व १८४ मध्ये दर्शविलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, न्यायालयीन आयोगाचे काम केल्यानंतर मी प्रतिवादींसोबत भाग्यश्री ढाबा येथे जेवण्यासाठी गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी हे माझे पुर्वी पक्षकार असल्याने त्यांना मदत होण्यासाठी त्यांना बाजूने अहवाल व नकाशा तयार केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी हेतुपूर्वक गट नं.२५० मधील रस्त्याचे अपुर्ण वर्णन केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट नं.२५० मधील रस्ता हा गट नं.२६३ पर्यंत असतांनाही त्याचा उल्लेख हेतुपूर्वक अहवाल व नकाशामध्ये केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, शेणखताचा ढिगार अस्तीत्वात नसतांनाही तो अहवाला व नकाशात दर्शविला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी हेतुत:प्रतिवादींच्या बाजूने साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

दि.१७/१०/२०२३.

दिवाणी न्यायाधीश क.स्तर यावल.